REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# नागपूर महानगरपालिकेतील राजकारणात महिलांचा सहभाग



सुनील रामराव अखंडे
राज्यशास्त्र विभाग , रा. तु. म. नागपूर विद्यापीठ नागपूर.

## प्रस्तावना :—

भारतीय समाजव्यवस्था ही पुरातन काळापासून पुरुषप्रधान राहिलेली आहे. निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग नेहमी, अनन्य राहिला. सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना कोणतेच अधिकार नव्हते. त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी नव्हती. राजकीय क्षेत्रात अशी संधी दिली जात नव्हती. अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत राजकीय क्षेत्रात स्त्रियांची उपेक्षा केली जात होती. त्यांच्यावर अनेक प्रकारची बंधने टाकण्यात येत होती. विसाव्या शतकात मात्र स्त्रियांचा विकास करण्याच्या दृष्टीने सर्व पातळीवर प्रयत्न सुरू झाल्याचे दिसते. स्त्रियांचा जर खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य दिले गेले तर स्त्रियांदेखील कोणत्याही क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने काम करू शकतात. हे विसाव्या शतकाने दाखवून दिले आहे.

भारतामध्ये स्त्रियांचा सामाजिक अणि राजकीय क्षेत्रातील सहभाग फारच मर्यादित होता त्यांना निम्न दर्जाची वागणून मिळत असे. स्त्रियांचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने दोन चळवळ व दुसरी म्हणजे सामाजिक सुधारणा चळवळ, राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, जोतिराव फुले, महादेव गोविंद रानडे, धोंडो केशव कर्वे इत्यादींनी स्त्रियांचा निरक्षरतेचा मागासलेपनाचा व त्यांच्यावरील अन्यायाचा प्रश्न जोरकसपणाने समाजासमोर मांडला. ब्रिटिशांमुळे स्त्रियांना शिक्षण होण्याची संधी मिळाली व सतीप्रथेसारख्या क्रूर प्रथांविरोधी कायदे तयार झाले भारतामध्ये स्त्रियांचा सामाजिक, राजकीय सहभाग फारच मर्यादित होता. राजकारण हा फक्त पुरुषांची मक्तेदारी असलेला प्रांत समजला जात होता. त्यामुळे स्त्रियांना राजकारणात फारसा वाव मिळाला नव्हता. स्त्रियांनी राजकारणापासून दूर राहणे हे केव्हाही चांगले ही समाजाची धारणा होती. त्यामुळे राजकारणात सहभागी होणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी होती.

स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण बरेच असले तरीही सहभागाच्या दृष्टीने सहभाग नगन्य राहिलेला आहे. पंचायत राज आणि महानगरपालिकेत राजकिय सहभाग वाढविण्याचा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळापासूनच होत आहे.

## महिला आरक्षणाचा उद्देश :—

''नॅशनल पर्स्पेक्टिव्ह प्लॅन फॉर द वुमेन १९८८'' द्वारा ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषद व महानगरपालिकांपर्यंत ३० टक्के आरक्षण सुचविण्यात आले होते. ७३ व्या संविधान दुरुस्ती अगोदर अनेक राज्यांत महिलांसाठी आरक्षण होते. जसे कर्नाटक पंचायत अधिनियम १९८३ नुसार महिलांसाठी २५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. हिमाचल प्रदेशातही अशाच प्रकारची व्यवस्था होती. महाराष्ट्रात सुद्धा ७३ व्या घटनादुरूस्तीने महिलानां ३३ टक्के आरक्षण देऊन नंतर २०११ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

LBP PUBLICATION

राजकिय प्रतिनिधीत्व देतांना एखाद्या गटासाठी जागा राखीव ठेवणे व विविध क्षेत्रात न्याय व समान वागणूक देण्याची नैतिक जबाबदारी राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार राज्यसंस्थेवर टाकण्यात आली आहे. महिलांना स्वत:चे राज्यव्यवस्थेत स्थान निर्माण करता यावे महिलांच्या अधिकारासाठी निर्णय निर्धारण प्रक्रियेत हस्तक्षेप करता यावा निर्णय पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होता यावे निर्णय क्षमता निर्माण व्हावी महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडता यावी हा आरक्षणाचा उद्देश खालीलप्रमाणे आहे.

१) महिलांना सत्तेमध्ये सहभाग मिळावा.
२) महिलांना आपल्या अधिकार कर्तव्याची जाणीव व्हावी.
३) निणर्य प्रक्रियेत स्त्रियांचे स्वतंत्र योगदान असावे.
४) स्त्री पुरुष समानता निर्माण व्हावी
५) निर्वाचन प्रक्रियेत त्यांचा स्वतंत्र सहभाग असावा.

महिलांना आरक्षण दिल्यामुळे त्यासुदधा पुरूषांप्रमाणेच समाजकारण व राजकारण करू शकतात. त्यांचा आत्मविश्वास वाढून त्या स्वावलंबी बनू शकतात. महिलांना आपल्या अधिकाराची जाणीव होऊन त्या शासन कारभारात अधिक सक्रिय होऊ शकतात. राजकीय सत्तेचा वापर कसा करावा यांची जाणीव महिलांमध्ये निर्माण हाईल. महिलांच्या समस्या महिला नेतृत्त्वच जास्त चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात व सोडवूही शकतात. महिलांचा राजकीय सहभागाची संधी मिळाल्यास सक्षम महिला नेतृत्त्व निर्माण होऊ शकते. महिला नेतृत्त्व राहिल्यास इतरही महिला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यात सहभागी होतील महिलांचा राजकीय सहभाग वाढावा. राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळावा हा उद्देश आरक्षणाचा आहे. धनशक्ती बलशक्ती आणि पुरुष समाजव्यवस्थेत होणाऱ्या निवडणुकांत महिलांना निवडून येणे सोपे नाही. ग्रामपातळीवर तर महिलांना हे अधिकच कठीन जाते. कारण जात, धर्म, दारिद्रय निरक्षरता व परंपरेचा पगडा या ग्रामीण भागात अजूनही पगडा दिसतो. आरक्षणामुळे महिलांसाठी राखीव जागांवर महिलांना निवडून द्यावेच लागते. या सोयीमुळे महिलांचे प्रतिनिधित्व वाढू शकते.

## नागपूर महानगरपालिका निर्मिती

भारताच्या नकाशात हृदयस्थानी कोरलेले एक महत्त्वाचे सर्वांग सुंदर गौरव संपन्न इतिहासात लाभलेले शहर म्हणजे नागपूर होय. नाग नामक सरितेच्या किनारी वसलेल्या या शहराला प्रांरभापासून गौरवपूर्ण इतिहास लाभलेला आहे. या शहराने पौरानिक, ऐतिहासिक, राजकीय, व्यावसायिक इत्यादी विविध क्षेत्रात आपले नाव सवर्णक्षरात कोरले आहे. या शहराचे भौगोलिक दृष्ट्या क्षेत्रफळ ५२.७१५.२ एकर एवढे असून २००१ च्या जनगणेनुसार या शहराची जनसंख्या २०,५२,३२० एवढी होती. आता २०११ च्या जनगणनेनुसार नागपूर शहराची लोकसंख्या २४,९७,८७० एवढी एकून लोकसंख्या आहे. त्यामध्ये १२,७४,१३८ पुरुष आणि १२,२३,७३२ स्त्रियांची संख्या आहे.

## नागपूर शहराची वैशिष्ट्ये :—


१) महाराष्ट्राची उपराजधानी.
२) भारताच्या मध्यभागी असलेले शहर.
३) ऑरेंज सिटी/संत्र्याकरिता प्रसिद्ध शहर.
४) भारतातील तिसऱ्या क्रमांकाची ग्रीन सिटी.
५) महाराष्ट विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन येथे असते.
६) नागपूर हे कॅझमॉपॉलिस शहर आहे.


बक्त बुलंद शहा या गोंड राजाने नागपूर शहर वसविले असा पुरावा आढळतो. गोंड राजानंतर रघुजी भोसले यांनी या शहराला आपल्या कारभाराचे केंद्र बनविले १८५३ मध्ये भोसल्याची सत्ता संपृष्टात येऊन ब्रिटिशानी सुरूवात केली. आजही महानरगपालिकेच्या महाल क्षेत्रात "राजे रघुजीराव भोसले भवन भोसल्यांच्या शासनाची साक्ष देते.

लाहोर, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास इत्यादी कार्पोरेशनच्या घटनेचा आधार घेऊन नागपूर महानगरपालिकेची घटना तयार करण्यात आली. असे १८४८ च्या अधिनियमद्वारे २ मार्च १९५१ रोजी

नागपूर महानगरपालिका अस्तित्वात आली. जून १९५२ मध्ये निवडणूक झाल्यावर २ जुलै १९५२ राजी नागपूर महानगरपालिकेची पहिली सभा भरली व यासभेचे अध्यक्ष बॅरिस्टर शेषराव वानखेडे हे होते. पुढे १९५२ रोजी त्यांची नागपूरचे महापौर (मेयर) म्हणून निवड करण्यात आली. पुढे नागपूर महानगरपालिकेचा कारभार पाहण्यासाठी तीन प्रमुख सत्ता निवड करण्यात आल्या (१) महानगरपालिका (२) स्थायी समिती (३) प्रमुख शासनाधिकारी.

दिवसेंदिवस नागपूर शहराच्या लोकसंख्येत वाढ झाल्याने महानगरपालिकेचा जुन्या नियमांच्या स्वरूपात अमूलाग्र बदल घडून आला असून सुधारीत नागपूर महानगरपालिकेध्ये १२ झोन आहे. महानगरपालिकेतील सदस्यांची संख्यासुद्धा वाढत आहे. त्यामुळे महानरगपालिकेत सध्यास्थितीत एकून ३४ विभाग असून त्याद्वारे नागपूर शहराचा कारभार पाहिला जातो. महानगरपालिकेत एकून १२ झोन असून १३६ वार्ड ३८ प्रभागामध्ये ३ ते ४ वार्ड प्रत्येक प्रभागामध्ये अशा पद्धतीने विभागले गेले. नागपूर महानगरपालिकेतील खालील प्रमाणे वर्षानिहाय एकून सदस्य संख्या दिली असून त्यात महिलां प्रतिनिधीची सदस्य संख्या खालील आलेखात दिलेली आहेत ती खालीलप्रमाणे :—




नागपूर महानागपालिकेत महिलांच्या राजकीय सहभागाचा विचार केल्यास काही कालावधीमधील महिलांचा सहभाग लक्षात घ्यावा लागेल. त्यामध्ये सर्वप्रथम महानगपालिकेत महिलांना आरक्षणामुळे प्रतिनिधीत्व मिळाले आणि महिला महानागपालिकेच्या राजकारणात सहभागी झाल्या आणि त्यांना प्रतिनिधीत्व मिळाले. गल्या २० वर्षाचा कालावधी लक्षात घेतला तर नागपूर महानगरपालिकेत महिलांना मिळालेले प्रतिनिधीत्व यांचा अभ्यास करावा लागेल. यात १९९७ पासून तर २०१७ पर्यंत महिलांचा

सहभाग कसा वाढत गेला हे वरील आलेखावरून लक्षात येते. १९९७—०२ या पाच वर्षाच्या कालावधीत नागपूर महानगरपालिकेत एकून सदस्य संख्या ही १२९ इतकी होती. त्यात महिला प्रतिनिधी ह्या ४३ महिला नगरसेवक होत्या. त्यांची एकून टक्केवारी ३३.३३ टक्के होती. नंतरच्या कालावधी म्हणजेच २००२—०७ या कालावधीत एकून १४२ नगरसेवकांमध्ये महिलां नगरसेवकांची संख्या ही ४८ होती. म्हणजेच ३३.८० टक्के इतकी होती. त्यानंतरच्या काळात २००७—१२ या कालावधीत एकून १३१ नगरसेवक होते त्यात महिला नगरसेवकांची संख्या ही ४० होती. म्हणजे ३०.५३ टक्के इतकी होती. नंतर २०१२—१७ या कालावधीत एकून १५१ नगरसेवक होते. त्यात महिलांचे नगरसेवकांचे प्रमाण हे ८३ होते. त्यांची एकून टक्केवारी ५४.३० टक्के होती. यावरून लसे लक्षात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये म्हणजेच महानगरपालिकेत आरक्षण असल्यामुळे राजकारणात महिलांचा सहभाग वाढत आहे. महाराष्ट्रात २०११ पासून महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के आरक्षण दिल्या गेले. तेव्हापासून राजकारणामध्ये महिला प्रतिनिधीत्वाचा सहभाग वाढला आहे.

## निष्कर्ष :—

नागपूर महानगरपालिकेतील माहिला प्रतिनिधीत्वाचा राजकारणातील सहभाग या विषयामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ७३ व्या घटनादुरुस्ती प्रमाणे महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळले. २०११ मध्ये महाराष्ट्रात महिलांना स्थनिक स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के आरक्षण दिल्या गेले. तेव्हापासून राजकारणामध्ये महिला प्रतिनिधीचा सहभाग वाढला स्त्रियांची राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी ही तरतूद करण्यात आली. आरक्षण लागू होण्यापूर्वी महिला प्रतिनिधीची संख्या नगन्य होती. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीयांना चार भिंतीत कोडून ठेवले होते. त्यांना दुय्यम दर्जा दिला होता राजकीय पक्ष महिलांना उमेद्वारी द्यायला उद्यूक्त नव्हते जाहीरनाम्यात समान अधिकाराचा ढिंढोरा पिटत असेल तरी प्रत्यक्षात उलट परिस्थिती होती. स्त्रीयांना राजकीय क्षेत्रात आणण्याठी आरक्षण आवश्यकच होतो. आरक्षणाने राजकीय सत्तेत त्यांना वाटा मिळाला महिला/महापौर सभापती आणि सरपंच बनल्या. महिलांना स्थानिक संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यासोबतच आता विधानसभेत व संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण व सरकारी नोकऱ्यामध्ये महिलांना आरक्षण देण्याचे धोरण भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने आपल्या घोषनापत्रात केले आहे. ते कितपत शक्य होते. अशाप्रकारे महिला राजकारणातील सहभाग वाढत आहे.

## संदर्भग्रंथ सूची : —


१) बोधनकर सुधीर : 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.
२) पाटिल प्रतिभा : 'संसदीय लोकशाहीतील महिलांचा सहभाग', योजना जानेवारी, २००६.
३) गोटे शुभांगी : 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या', वरद पब्लिकेशन, औरंगाबाद, २००४
४) नागपूर दर्शिका : प्रकाशक म.न.पा. उपनिगम आयुक्त, १९९७.
५) नागपूर महानगरपालिका माहिती पुस्तिका : प्रकाशक म.न.पा. निगम सचिव, २०१७.





**सुनील रामराव अखंडे**
राज्यशास्त्र विभाग , रा. तु. म. नागपूर विद्यापीठ नागपूर.